# संगमनेर बसस्थानक परिसरात विविध कार्यक्रमांना परवानगी देऊ नका

## व्यापारी संकुल सहकारी संस्थेची निवेदनातून मागणी

**संगमनेर (प्रतिनिधी)–** हायटेक बसस्थानक म्हणून ओळख निर्माण झालेल्या संगमनेर बसस्थानक परिसराचा सध्या फलकबाजी, मेळावे आणि रॅलीमुळे श्वास कोंडत आहे. याचा परिणाम व्यापारावर होत असून या भागामध्ये परवानगी देऊ नये ,अशी आग्रही मागणी व्यापारी संकुल सहकारी संस्थेच्यावतीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, परिवहन मंत्री, माजी मंत्री, आमदार यांना देण्यात आले आहे.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर बसस्थानकाची शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी निर्मिती करण्यात आलेली आहे. या स्थानकातील गाळे हे बीओटी तत्त्वावर असून व्यावसायिकांनी घेतले आहेत. मात्र अलिकडच्या काळात दररोज येथे विविध कार्यक्रम होत असून अनेक प्रकारचे फलक लावले जात आहे. त्यामुळे दुकानांचा दर्शनी भाग झाकला जातो. याचबरोबर विनापरवानगी डीजे, गर्दी आणि फलकबाजीमुळे आमच्या रोजीरोटीवर मोठा परिणाम होत असल्याचे संगमनेर बसस्थानक गाडीधारकांचे व्यापारी संकुल सहकारी संस्थेने निवेदनात म्हटले आहे. तरी शासनाच्या आदेशान्वये बीओटी तत्त्वावरील गाळ्यांसमोरील वाहनतळावर कोणत्याही शासकीय, निमशासकीय, शालेय, राजकीय अथवा खासगी संस्थांच्या कार्यक्रमांना परवानगी देऊ नये. विनापरवानगी लावलेले फलक तातडीने काढण्यात यावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. सदर निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार अमोल खताळ, सत्यजीत तांबे यांना देण्यात आले आहे.

## गळ्याला फास लागून महिलेचा मृत्यू

**सिन्नर–** तालुक्यातील नांदूर शिंगोटे येथील मुंढे इंडस्ट्रिज प्रा.लि. या कारखान्यात मशिनवर काम करत असणाऱ्या बिहार येथील ३३ वर्षीय महिलेचा गळ्यातील ओढणी व डोक्याचे केस बॉबीन मशीनमध्ये अडकून लपेटला गेल्याने मृत्यू झाल्याची घटना सकाळी १०.३० च्या दरम्यान घडली.

# जेवणासाठी चांदीच्या ताटाचा हट्ट हुंडा नाही

## शेतकरी तरुणाची निर्दोष सुटका करताना उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**मुंबई–** लग्नादरम्यान चांदीच्या ताटात जेवण न मिळाल्याने नवरदेवाने नाराज होणे ही तात्पुरती समस्या असून त्याला हुंड्याची मागणी म्हणता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, हुंड्याची मागणी आणि शारीरिक छळवणूक केल्याच्या आरोपांतून पुणेस्थित ३३ वर्षांच्या शेतकरी तरूणाची निर्दोष सुटका केली. याचिकाकर्ता लग्नादरम्यान चांदीच्या ताटात जेवण न मिळाल्याने नाराज झाला होता. त्याची ही नाराजी तात्पुरती होती. त्याच्या या कृतीला हुंड्याची मागणी म्हणता येणार नाही. किंबहुना, लग्नानंतर याचिकाकर्ता आणि त्याची पत्नी आनंदाने एकत्र नांदत होते. त्यांना एक मुलगाही आहे, असे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांनी याचिकाकर्त्याला कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली शिक्षा रद्द करताना नमूद केले. तसेच, सरकारी पक्ष याचिकाकर्त्यावरील हुंड्याच्या मागणीचा आरोप सिद्ध करू शकले नाहीत, अशी टिप्पणीही न्यायालयाने केली.

याचिकाकर्त्याला हुंड्याची मागणी करणे, हुंड्यासाठी शारीरिक छळ करणे या आरोपांतर्गत दंडाधिकाऱ्यांनी दोषी ठरवले होते. तसेच, त्याला दोन वर्षांचा कारावास आणि ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली होती. तर त्याच्या कुटुंबातील सदस्यांची निर्दोष सुटका केली होती. सत्र न्यायालयानेही कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. त्यामुळे, याचिकाकर्त्याने त्याविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

सरकारी कार्यालयात लिपिक म्हणून काम करणाऱ्या पत्नीचा याचिकाकर्त्याने आणि त्याच्या कुटुंबाने दोन वर्षे हुंड्यासाठी शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी सुनावणीच्या वेळी केला होता. लग्नाच्या वेळी चांदीचे ताट, सोन्याच्या अंगठ्या आणि इतर वस्तू आणि पैशांची मागणी केल्याचा आरोप याचिकाकर्त्यावर होता. शिवाय, याचिकाकर्त्याने पत्नीला मारहाण केली आणि त्याच्या कुटुंबीयांनीही तिला टोमणे मारले, असा आरोपही त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. शिळे अन्न फेकून दिल्याने याचिकाकर्त्याने आपल्याला बेदम मारहाण केली होती. त्यामुळे आपण बेशुद्ध पडल्याचे आणि आपल्याला रुग्णालयात दाखल केल्याचा दावा पत्नीच्या वतीने तक्रारीत करण्यात आला होता. तिच्या या दाव्याला वैद्यकीय पुराव्यांतून पुष्टी मिळते, असेही सरकारी वकिलांनी न्यायालयाला सांगितले. तथापि, पोलिसांनी या प्रकरणी चुकीचा निष्कर्ष काढल्याचा दावा याचिकाकर्त्याच्या वकिलांनी केला व वैद्यकीय पुरावे आणि साक्षीदारांच्या जबाबातील विरोधाभास न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. न्यायालयानेही याचिकाकर्त्याचा दावा मान्य केला. तसेच, हुंड्याच्या मागणीशी या मारहाणीचा संबंध असल्याचे कोणतेही पुरावे आढळले नाही, असे आदेशात म्हटले. पत्नीला मारहाण झाल्याचे वैद्यकीय पुरावे असले तरी हुंड्यासाठी तिला मारहाण केल्याचे सिद्ध झालेले नाही. शिवाय, आरोपीविरोधातील आरोप सिद्ध करण्यासाठी पोलिसांनी कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची तपासणी केली नाही. थोडक्यात, याचिकाकर्त्याने पत्नीच्या कुटुंबीयांकडे हुंड्याची मागणी केल्याबद्दल फिर्यादी पक्षाच्या साक्षीदारांनी दिलेल्या पुराव्यांमध्ये तफावत असल्याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

हुंड्याशी संबंधित मागण्या आणि क्रूर वागणूक दिल्याचा आरोप सिद्ध करण्यासाठी ठोस पुरावे आवश्यक आहेत. परंतु, याचिकाकर्त्यावरील हे आरोप सिद्ध करण्यात पोलिसांना अपयश आल्याचे स्पष्ट करताना दंडाधिकारी आणि सत्र न्यायालयानेही ही बाब विचारात घेतली नसल्याचे ताशेरे न्यायमूर्ती डिगे यांच्या एकलपीठाने ओढले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस पतसंस्थेला ३८ लाखांचा नफा

**संगमनेर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील हंगेवाडी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेला मार्च २०२५ अखेर ३८ लाख ५४ हजार ७७४ रुपयांचा नफा झाल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष प्रतीक सांगळे यांनी दिली.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे संचालक व जिल्हा बँकेचे संचालक गणपत सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली नेताजी सुभाषचंद्र बोस पतसंस्थेची स्थापना झाली आहे. संस्थेने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेला बँको पुरस्कार व राज्य फेडरेशन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. संस्थेच्यावतीने कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले आहे. त्याचबरोबर नेत्र तपासणी शिबीर, आरोग्य शिबीर अशा सामाजिक कार्यातही संस्था कार्यरत आहे. सभासदांना दरवर्षी १० टक्के लाभांश वाटप करण्यात येते. त्याचबरोबर गरजू सभासदांना वैद्यकीय मदतही संस्थेकडून देण्यात येते. सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक यांच्या विश्वासावर संस्थेची वाटचाल प्रगतीपथावर आहे. संस्थेचे ३१ मार्च २०२५ अखेर भाग भांडवल २८ लाख ४६ हजार ५७० रुपये, स्वनिधी ७८ लाख ६७ हजार ३१४ रुपये, ठेवी १६ कोटी ८ लाख ९५ हजार ७६ रुपये, कर्जे ११ कोटी ३२ लाख १६ हजार ९९० रुपये, गुंतवणूक ६ कोटी १९ लाख ६९ हजार ७३४ रुपये असून संस्थेला गेल्या आर्थिक वर्षात ३८ लाख ५४ हजार ७७४ रुपये नफा झाला आहे. संस्थेचा सीडी रेषो ६७.८० टक्के असून नेट एनपीए १.५० टक्के आहे. संस्थेचा एकूण व्यवसाय ११० कोटी ९३ लाख ४५ हजार ४५७ रुपये झाला आहे. संस्थेच्या व्यवसायात गेल्या वर्षात २२ कोटी २२ लाख रुपयांची वाढ झाली आहे. संस्थेच्या प्रगतीत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणपत सांगळे, विद्यमान अध्यक्ष शिवाजी भोसले, उपाध्यक्ष प्रतीक सांगळे, सरव्यवस्थापक सोमनाथ वाघ, संचालक मंडळ व सर्व कर्मचारी वृंद यांचा मोलाचा वाटा आहे.

## श्रीराम जन्मोत्सव सिन्नरला उत्साहात साजरा

**सिन्नर (प्रतिनिधी)–** भाविकांच्या अलोट गर्दीत येथील सीताराम मंदिरात, श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासून ग्रामदैवत भैरवनाथ मंदिरातील भजनी मंडळाच्या भजनांना प्रारंभ झाला. विलास महाराज भगत व सहकाऱ्यांनी म्हटलेल्या भजनात भाविक तल्लीन झाले. दुपारनंतर टाळ मृदंगाचा स्वर व रामनामाचा जप टिपेला पोहोचला आणि दुपारी १२ वाजता जय जय श्रीरामच्या गजरात फुलांची उधळण करत श्रीराम जन्मोत्सव साजरा झाला. ज्येष्ठ नेते प्रकाशभाऊ वाजे, बाळासाहेब चकोर, प्रमोद चोथवे, भाऊसाहेब शिंदे, विठ्ठल जपे, सोमनाथ वाघ, बाळासाहेब हांडे, सोमनाथ वाघ, राजेंद्र नाईक, महेश नाईक, राजेंद्र टावरी, बाळासाहेब हांडे, सुनील चकोर, डॉ. वा. श्री. दुगल यांच्यासह भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिरात सकाळी पूजा, अभिषेक, आरती आदी कार्यक्रम झाले. भूषण व निनाद रत्नाकर यांनी सपत्नीक म हापूजा केली. सायंकाळी शांतीपाठ झाला. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. सीताराम मंदिर न्यास व पुरोहित संघाने यावेळी चोख व्यवस्था ठेवली होती.

# मीनाताई जगधने यांनी घेतला रयतच्या गुणवत्तेचा ध्यास- डॉ. पोंधे



**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागातील ४०४ विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले. तर सारथी शिष्यवृत्तीसाठी १०१२ विद्यार्थी पात्र ठरलेले आहेत. ही आत्तापर्यंतची सर्वोच्च संख्या आहे. एनएमएमएस पात्र विद्यार्थ्यांनी एकूण १ कोटी ९३ लाख ९२ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळवली. तर सारथी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांनी एकूण ३ कोटी ८८ लाख ६० हजार ८०० रुपये अशी एकूण ५ कोटी ८२ लाख ५२ हजार ८०० रुपये शिष्यवृत्ती उत्तर विभागीय विद्यार्थ्यांनी शासकीय तिजोरीतून सन्मानाने मिळवली आहे. या यशामागे रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग काउन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या गुणवत्तेसाठी घेतलेल्या ध्यासामुळेच रयत शिक्षण संस्थेतील उत्तर विभाग या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये यशाचे उत्तुंग शिखर गाठू शकला, असे प्रतिपादन स्वामी सहजानंद भारती शिक्षण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागाने विशेष गुणवत्ता धारण केल्याबद्दल श्रीरामपूर रयत संकुलाच्या वतीने मीनाताई जगधने यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी डॉ. पोंधे बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पूर्वी गुणवत्तेत मागे असणारा उत्तर विभाग त्यांच्या प्रयत्नामुळेच प्रथम स्थानावर आलेला आहे, गुणवत्तेसाठी त्यांनी उत्तर विभागातील तज्ज्ञ शिक्षकांची एक टीम तयार करून स्वतंत्र गुणवत्ता कक्ष स्थापन केला. त्यावर माजी सहाय्यक विभागीय अधिकारी काकासाहेब वाळुंजकर यांची विभाग प्रमुख म्हणून नियुक्ती केली. विषय शिक्षकांसाठी उद्बोधन वर्ग, विविध प्रकाशनाच्या व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका सोडवून घेणे, सराव वर्ग, विद्यार्थी-पालक समुपदेशन, पालक सभा, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन मार्गदर्शन वर्ग, नाविन्यपूर्ण संकल्पना वापरून शिक्षक व मुख्याध्यापकांना प्रेरणा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या, शिक्षकांच्या अडचणी, पालकांचे प्रश्न सोडवण्यात त्या अहोरात्र तत्पर असतात. उत्तर विभागातील विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश व विभागाला संस्थेत प्रथम स्थानावर मिळालेले मानांकन यात श्रीरामपूर रयत संकुलाच्या अध्यक्षा मीनाताई जगधने यांचे नेतृत्व, कुशल प्रशासन व व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचे डॉ. मुकुंद पोंधे यांनी सांगितले. यावेळी जनरल बॉडी सदस्य प्रकाश निकम, बापूसाहेब पठारे, डॉ. रवींद्र जगधने, प्रा. शंकरराव पुंड, प्राचार्य डॉ. प्रवीण बडदे, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, मुख्याध्यापक सुनील साळवे, प्रा. नान्नर, प्रा. करवर, प्रा. शिंदे, प्रा. पाटोळे, प्रा. भोये, प्रा.गागरे आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरुन

## देशात यंदा सरासरी इतका पाऊस पडणार

भारतीय हवामान विभागाकडून या वर्षी मान्सूनवर पडणाऱ्या एल निनोच्या प्रभावाची शक्यता नाकारण्यात आली आहे. एल निनोमुळे मान्सूनच्या पावसावर मोठा प्रभाव पडतो. मान्सूच्या प्रमाणात घट होते. एल निनोची निर्मिती ही प्रशांत महासागराचं तापमान वाढल्यामुळे होते. एल निनोचा परिणाम हा भारतात मान्सून दरम्यान पडणाऱ्या पावसावर होत असतो. एल निनोमुळे भारतातील पर्जन्यमानामध्ये सरासरीच्या तुलनेत घट होते.

दरम्यान २०२३ मध्ये एल निनोचा मोठा प्रभाव हा मान्सूनवर पडल्याचं पाहायला मिळालं होतं. एल निनोमुळे मान्सूनच्या प्रमाणात सरासरी ८ टक्के घट झाली होती. तर गेल्या वर्षी ना निनाच्या प्रभावामुळे ८ टक्के अतिरिक्त मान्सूनचा पाऊस पडला. ज्याचा मोठा फटका हा शेतकऱ्यांना बसल्याचं पाहायला मिळालं. २०२३ मध्ये एल निनोमुळे कोरडा दुष्काळ होता तर २०२४ मध्ये ना निनामुळे ओला दुष्काळ होता. मात्र यंदा सरासरी इतकाच पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

## घरगुती गॅस सिलिंडर ५0 रुपयांनी महागला

१०० रुपयांची कपात केली होती. विशेष म्हणजे मार्च २०२३ नंतर घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ झाली आहे. गॅस सिलेंडरच्या किमतीत ५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. दुसरीकडे, सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींबाबतही भाष्य केले आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती लवकरच कमी होऊ शकतात असे सरकारने म्हटले आहे.

केंद्र सरकारने एलपीजी सिलीडरच्या किमतीत ५० ची वाढ जाहीर केली आहे.आता घरगुती गॅस सिलेंडरची किंमत ८०३ वरून ८५३ झाली आहे. उज्ज्वला योजनेच्या लाभार्थ्यांसाठीही अनुदानित सिलेंडरची किंमत ५०० वरून ५५० करण्यात आली आहे. या वाढीचा देशभरातील कोट्यवधी ग्राहकांना फटका बसणार आहे. एलपीजी सिलीडरच्या किंमतीत प्रति सिलेंडर ५० रुपयांनी वाढ होणार आहे. अनुदानित लाभार्थ्यांसाठी ५०० रुपयांवरून ते ५५० रुपयांपर्यंत आणि इतर सर्वसामान्यांसाठी ही दरवाढ ८०३ रुपयांवरून ८५३ रुपयांपर्यंत असणार असल्याचे पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी म्हटले आहे.

## दिव्यांग लाभार्थ्यांचेही पैसे बँक खात्यात जमा होणार

अशा दिव्यांग बांधवांच्या आयुष्यात समृद्धी निर्माण करण्यासाठी काल सुसंगत नवनवीन योजना, धोरणांची निर्मिती करण्याचे निर्देश देत फडणवीस यांनी या धोरणांची योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे दिव्यांग बांधवांच्या विविध समस्यांबाबत आयोजित आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली.

**दिव्यांगाच्या रोजगारासाठी धोरण**

राज्यातील दिव्यांगाना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.दिव्यांगाच्या रोजगाराकरिता धोरण तयार करण्यात येणार असून रोजगार व स्टॉल बाबतचे धोरण तयार करण्याचे निर्देश कौशल्य विकास व उद्योग विभागाला दिले आहे.

राज्यातील दिव्यांग नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विशेष सहाय्य योजनेचे अर्थसाहाय्य थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले पाहिजे. ज्या लाभार्थ्यांचे बँक खाते आधार लिंक झाले नाही यासाठी जिल्हाधिकारी यांनी कालबद्ध कार्यक्रम हाती घ्यावा. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी डीबीटी प्रणालीचा अवलंब करणे गरजेचे आहे.

**दिव्यांगासाठी जिल्हा वार्षिक योजनेत एक टक्का निधी**

राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेत सन २०२५-२६ पासून प्रत्येक वर्षी नियमित योजनांसाठी अनुज्ञेय असलेल्या निधीमधून कमाल १ टक्का निधी राखीव ठेवण्यात येणार आहे. या निधीमधून दिव्यांगांसाठीच्या सर्व सोयी सुविधा एका छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग भवन उभारण्यात येईल, अशी माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.

## शेअर बाजारात त्सुनामी १९ लाख कोटी बुडाले

आहे. जापानमध्ये शेअर बाजार ९ टक्क्यांनी कोसळला आहे. तैवानचा बाजार १० टक्क्यांने कोसळला आहे. या शिवाय अमेरिकेच्या शेअर मार्केटमध्ये शुक्रवारी मोठी विक्री झाली.

**टॅरिफचा परिणाम**

ट्रम्प प्रशासनाने १८० हून अधिक देशांवर एकाचवेळी टॅरिफ लागू केले. त्याचा परिणामही बाजारावर दिसून आला आहे. ट्रम्प यांच्या या निर्णयामुळे गुंतवणूकदार धास्तावले आहेत. बाजारातील तज्ज्ञांच्या मते, विद्यमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत अजून मोठी घसरण पाहायला मिळू शकते.

**आर्थिक विकासदराबाबतची चिंता**

ट्रम्पच्या टॅरिफमुळे महागाई वाढण्याची शक्यता आहे. कंपन्यांची कमाई घटू शकते आणि लोक खर्च करण्यासाठी धस्तावतील. त्याचा परिणाम विकासावर होणार आहे. चीनने अमेरिकेच्या उत्पादनावर ३४ टक्के एक्स्ट्रा टॅक्स लावला आहे. तसेच जेपी मॉरगनने ग्लोबल रिशेसनची शक्यता ४० टक्क्यांने वाढवून ६० टक्के केली आहे. मार्चमध्ये परदेशी गुंतवणूकदारने भारतीय बाजारात पुनरागमन केलं होतं. पण एप्रिलमध्ये पुन्हा ते विक्री करत आहेत. केवळ एप्रिलमध्येच आतापर्यंत १३,७३० कोटी रुपयांची विक्री झाली आहे. जर भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापारी करार झाला नाही तर आऊटफ्लो अधिक वेगाने होऊ शकतो.

**आरबीआयच्या मुद्रा नीतीकडे लक्ष**

९ एप्रिल रोजी आरबीआयची एमपीसी बैठक आहे. सध्याची परिस्थिती पाहून रिझर्व्ह बँक व्याज दरात कपात करण्याची शक्यता आहे. त्याशिवाय या आठवड्यापासून मार्च तिमाहीचे निकाल येणं सुरू होईल. त्याचेही परिणाम बाजारावर होणार आहेत.

## एक्साईज ड्युटीत २ रुपयांनी वाढ

पाऊल पाहता सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार होणार आहे. खासकरुन जे रोज वाहनांनी प्रवास करतात. किंवा वाहतूक क्षेत्राशी संबंधित आहेत त्यांना या पेट्रोल आणि डिझेल दरवाढीचा फटका बसणार आहे.

**एक्साईज डयुटी म्हणजे काय?**

पेट्रोल आणि डिझेलवर आकारला जाणारा उत्पादन शुल्क (एक्साईज डयूटी) हा केंद्र सरकारकडून आकारला जाणारा कर आहे, या करामुळे इंधनाचे दर मोठ्या प्रमाणात वाढत असतात. सध्या पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १९.९० रुपये आहे. डिझेलवरील उत्पादन शुल्क सुमारे १५.८० रुपये प्रति लिटर आहे. साल २०१४ मध्ये पेट्रोलवर उत्पादन शुल्क ९.४८ रुपये प्रति लिटर होते आणि डिझेलवर ते ३.५६ रुपये प्रति लिटर होते, ते नंतर अनेक वेळा वाढवण्यात आले. सोमवारी सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लिटर २ रुपयांची वाढ केली. या आदेशात म्हटले आहे की पेट्रोलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १३ रुपये आणि डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर १० रुपये वाढवण्यात आले आहे.

## शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीला मान्यता

पात्रता धारण करणारा कार्यरत चतुर्थश्रेणी कर्मचारी पदोन्नतीसाठी इच्छुक नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहणार आहे.

## निळवंडेतून शेतीसाठी आवर्तन सुरू

पाणी सोडण्यात आले. जायकवाडी धरण भरल्यामुळे यावर्षी निळवंडे भंडारदरा धरणातून पाणी सोडावे लागले नाही. तसेच लाभ क्षेत्रातही चांगला पाऊस पडला त्यामुळे उन्हाळी हंगामाच्या सुरुवातीला दोन्ही धरणांमध्ये चांगल्या प्रकारे पाणी उपलब्ध आहे. काल सोमवारी सकाळी भंडारदरा धरणात ६९३४ दलघफू तर निळवंडे धरणात ३३३३ दलघफू पाणी शिल्लक होते. भंडारदरा धरणात ६२.८१ टक्के तर निळवंडे धरणात ४० टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.दोन्ही धरणांमध्ये मिळून सुमारे दहा टीएमसी पाणी सिंचनासाठी शिल्लक आहे. मात्र या पाण्याचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

भंडारदरा धरणातून वीज निर्मिती साठी ७५२ क्युसेक्स पाणी सोडण्यात येत आहे. कोदणी येथील वीज प्रकल्पही सुरू झाला आहे.त्यामधून सकाळी २३५७कयुसेक्स पाणी सोडण्यात येत होते. नदीपात्रात पाणी सोडण्यात आले असले तरी निळवंडे च्या कालव्यातून पाणी सोडलेले नाही, मात्र उच्चस्तरीय डाव्या कालव्यातून विसर्ग सुरु करण्यात आला आहे. तालुक्याच्या उत्तर भागांतील आढळा धरणात ही मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. १०६० दलघफू क्षमतेच्या या धरणात आज सकाळी ६७९दल घ फु (६४.०६ टक्के)पाणी शिल्लक होते. दरम्यान, विविध धरणांमधील पाणी साठा लक्षात घेता योग्य नियोजन झाल्यास यंदा लाभ क्षेत्राला पाणी टंचाई जाणवणार नाही असे दिसते.

## मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे गर्भवतीचा मृत्यू...

रुग्णालयाच्या प्रकरणात शासनाने पाच सदस्यीय समिती नेमली होती. त्यात पुणे परिमंडळाचे उपसंचालक डॉ.राधाकृष्ण पवार, सहायक संचालक डॉ. प्रशांत वाडीकर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.नागनाथ यम्पल्ले, पुणे मनपाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.निना बोराडे, आरोग्य सेवा पुणे मंडळाच्या स्त्रीरोग तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.कल्पना कांबळे यांचा समावेश होता. या समितीने शासनाला सादर केलेल्या अहवालात रुग्णाला तत्काळ दाखल करुन घेतले नाही, ही चूक असल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी अजून दोन अहवाल बाकी असल्याची माहिती चाकणकर यांनी यावेळी दिली.

सकाळी नऊ वाजता रुग्णलयात दाखल झालेल्या तनिषा यांना रक्तस्त्राव होत असतानादेखील तब्बल पाच तास थांबवून घेतल्याचेदेखील अहवालातून स्पष्ट झालं आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्य शासनाने चौकशी समिती स्थापन केली होती. या याप्रकरणी समितीने अहवाल सादल केला असून त्यामध्ये अनेक धक्कादायक माहिती समोर आल्या आहेत.

याबाबत माध्यमांशी बोलताना रुपाली चाकणकर म्हणाल्या, की हा राज्य समितीचा अहवाल आहे. इतर अहवाल आल्यानंतर रुग्णालयावर कारवाई होणार आहे. यामध्ये कोणाला वाचवायचे, कोणाला सोडायचे, असा काहीही विषय नाही. धर्मादाय आयुक्तांची नियमावली दीनानाथ रुग्णालयाने पाळली नाही. यातील एक म्हणजे रुग्णालयाच्या नावासमोर धर्मादाय असे लिहिणे आवश्यक होते. रुग्ण दीनानाथमध्ये सकाळी ९ वाजून १ मिनिटांनी गेला होता. नातेवाईकांनी डॉक्टरांशी संपर्क साधला होता. डॉक्टरांनी सर्जरीसाठी स्टाफला सूचना दिल्या होत्या. ऑपरेशन थिएटरमध्ये जाण्यापूर्वी दहा लाख रुपयांची मागणी करण्यात आली. कुटुंबीयांनी तीन लाख रुपये आहेत, असे रुग्णालयाला सांगितले होते. रुग्ण अडीच वाचता रुग्णालयातून बाहेर पडला. या पाच तासात रुग्णावर प्राथमिक उपचारही केले गेले नाहीत. यानंतर रुग्णाच्या नातेवाईकांनी रुग्णाला ससूनमध्ये नेले. तेथून ते १५ मिनिटांत ते बाहेर आले आणि सूर्या हॉस्पिटलमध्ये गेले. दुसऱ्या दिवशी डिलिव्हरी झाली, रक्तस्त्राव झाला आणि रुग्णाचा मृत्यू झाला. तिन्ही एकत्रित अहवालानंतर पोलीस काय कारवाई करायची, हा निर्णय घेतील. इतर दोन अहवालही लवकरच सादर होतील.

**पोलीस लिहिणार ससूनच्या अधिक्षकांना पत्र**

गर्भवती तनिषाला साडे पाच तास थांबवून ठेवले आणि उपचारही केले नाहीत, ही प्रथमदर्शनी माहिती पोलिसांना सीसीटिव्ही तपासल्यानंतर प्राप्त झाली आहे. या प्रकरणी थेट दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई करता येत नाही म्हणून पुणे पोलीस ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांना पत्र लिहिणार आहेत. दीनानाथ रुग्णालय येथे घडलेल्या प्रकरणाची चौकशी करून पोलिसांना अहवाल सादर करावा, असे या पत्रात सांगितले जाणार आहे. रुग्णालयाने रुग्णाच्या कुटुंबीयांकडून अनामत रक्कम ठेवण्याची मागणी केली होती का, याचीही चौकशी केली जाणार आहे.

## पुणे येथील गर्भवतीच्या मृत्यूच्या निषेधार्थ शिर्डीत डॉ. वर्पे यांचे अन्नत्याग आंदोलन

उचलावा. सज्ञान झाल्यानंतर त्यांना शासकीय नोकरीत घ्यावे याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच आरोग्य मंत्री यांना निवेदन देणार असल्याचेही डॉ. नचिकेत वर्पे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

## वास्तव्याचा पत्ता ठरणार रेशनकार्डचा...

अर्जांचा गट 'ब'च्या यादीत समावेश केला जाणार आहे. अ यादीतील रेशनकार्ड सादर केलेल्या कागदपत्राला अनुसरून योग्य त्या वर्गवारीत (अंत्योदय, प्राधान्य कुटुंब लाभार्थी आदी) पूर्ववत ठेवण्यात येणार आहे; तर ब यादीतील कार्डधारकांना १५ दिवसांच्या कालावधीत वास्तव्याच्या पुराव्यासह सर्व कागदपत्रे सादर करण्यास मुदत दिली जाणार आहे. मुदतीत पुरावे सादर न केल्यास आणखी १५ दिवसांची मुदत दिली जाईल. या काळातही पुरावे न दिल्यास रेशनकार्ड निलंबीत केले जाणार आहे. ही मोहिम नगर जिल्ह्यात राबवण्यात येणार असून त्यादृष्टीने तालुका पातळीवर सुचना देण्यात आले असल्याचे जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने सांगण्यात आले.

**यापूर्वी २०२१ मध्ये तपासणीचे आदेश**

राज्यात यापूर्वी २०२१ मध्ये रेशनकार्डची तपासणी मोहिम करण्याचे शासन आदेश काढण्यात आले होते. मात्र, आदेश काढण्यापलिकडे काहीच काम झाले नाही. यामुळे त्यावेळी रेशनकार्डची तपासणी झाली नव्हती. आता मयत, स्थालांतरी आणि परदेशात स्थायिक झालेल्या नागरिकांच्या शोध मोहिमेसाठी रेशनकार्ड तपासणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.